# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०९ सप्टेंबर २०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

: 7276494810 (PRO)


# जनता कर्फ्यु पाळण्याचे जनतेला आवाहन

## चंद्रपुर शहर, दुर्गापुर, उर्जानगर, पडोली आणि बल्लारशा याठिकाणी असणार जनता कर्फ्यु

चंद्रपुर शहराबरोबरच दुर्गापुर , उर्जानगर, पडोली व बल्लारशा शहरामध्ये कोरोना रुग्ण दिवसेदिवस वाढत असुन मागील काही दिवसात चंद्रपुर जिल्हयात एकुण ४,३८६ नागरीक कोरोना बाधीत होवुन त्यामधील ५१ कोरोना बाधीतांचा मृत्यु झालेला आहे. चंद्रपुर जिल्हयात होत असलेली रुग्ण वाढ ही अत्यंत चिंताजनक असुन रुग्णवाढ रोखण्याकरीता जनता संपर्क साखळी तोडणे आवश्यक आहे. याकरीता जिल्हा प्रशासनाने दिनांक १०/०९/२०२० ते १३/०९/२०२० असे एकुण चार दिवस जनता कर्फ्यु पाळण्याचे आवाहन केले आहे. कोरोना रुग्णांची दिवसेंदिवस वाढ होत असल्याने व संपुर्ण बाजारपेठ सुरु आहे यामुळे नागरीकांचा एकमेकांना संपर्क होवुन आणखी कोरोना रुग्णांची संख्येत वाढ होण्याची दाट शक्यता आहे. जनता कर्फ्यु दरम्यान चंद्रपुर शहर, दुर्गापुर, उर्जानगर, पडोली आणि बल्लारशा येथील सर्व नागरीकांनी अत्यावश्यक कारणांशिवाय घराबाहेर पडु नये असे आवाहन प्रशासना तर्फे करण्यात येत आहे.

**जनता कर्फ्यु दरम्यान खालील नमुद सेवा बंद व सुरु राहतील,**

बंद - सर्व किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने, फळ दुकाने, पान ठेले, चहा टप-या, फुटपाथवरील दुकाने हे सर्व बंद राहतील.

सुरु - दुध वितरण सेवा, सर्व रुग्णालय, औषधीचे दुकाने, पार्सल सुविधा, पेट्रोल पंप, वर्तमानपत्रे वितरण, शासकिय कार्यालय, बॅंका, एमआयडीसी, वेकोली व वेळेवर उद्‌भवणारे आकस्मिक बाबी (Unforeseen Emergency) हया बाबी वगळुन इतर सर्वप्रकारचे दुकाने/आस्थापना स्वयंफुर्तीने नागरीकांनी बंद ठेवावेत. जनता कर्फ्यु नागरीकांनी स्वत:हुन पाळयचा असुन यशस्वी करण्याकरीता त्याबरोबरच रुग्णांची वाढणारी संख्या रोखण्यासाठी जनतेचे सहकार्य आवश्यक आहे. यापुर्वी सुध्दा प्रशासनाकडुन वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत परंतु काही नागरीक सुचनांचे पालन करीत नाहीत. त्यामुळे पुढील ४ दिवस आपल्या घरातच राहुन जनता कर्फ्यु पाळणे हे आपले व आपल्या कुटुंबाच्या हिताचे असल्याने जनता कर्फ्यु पाळण्याचे आवाहन जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासना तर्फे करण्यात येत आहे.